# संगीताचार्य गुणीगंधर्व पं. लक्ष्मणप्रसादजी जयपूरवाले

**सरिता इंगळे**
संगीत विभाग प्रमुख स्व.सी.एम.कढी कला महाविद्यालय, परतवाडा, जि. अमरावती

**सारांश:**आपल्या संगीतकलेच्या नितांत रमणीय अशा उदयानातील अर्थाने निरनिराळ्या जातींचे सुंदर सुंदर असे गुलाबच होत. अशा संगीताच्या इतर घराण्याप्रमाणेच कुँवरश्याम घराण्याचे आपले वेगळे वैशिष्ट्ये, वेगळे अस्तित्व स्थापण केले. या घराण्याचे प्रणेता डॉ. कृष्णलालजी उर्फ लालजी महाराज उपाख्य कुँवरश्यामजी आहेत, परंतु घराण्याचे प्रचार–प्रसार करण्याचे श्रेय हे गुणीगंधर्व पं. लक्ष्मणप्रसादजी जयपूरवाले यांना दिले जाते कारण त्यांनी संगीत साधना व घराण्याच्या प्रचार–प्रसारासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले.

प्रस्तूत शोध निबंधात गुणीगंधर्वांच्या संगीतातील योगदानाचा आढावा घेतला आहे. बालपणापासून एकामागून एक येणा–या दुःखावर मात करीत स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण गायकी व रचना करून गायनात अलौकीक तेजोमयता निर्माण केली. बंदिशीत मुर्की, तिहय्या, गमक, छंद प्रबंध लयप्रधानता, स्वरलगावात सहजता अशा अनेक गुणवैशिष्ट्यांसह गायन, वादन व नृत्य तिन्ही कलेत पारंगत असणारे हे व्यक्तीमत्व तितकेच निगर्वी, विनम्र, सह्दयी व आध्यात्मिक प्रवृत्तीचे होते.

***प्रस्तावना :***

केवळ गाण्यासाठी जन्म घेणा–या या गंधर्वाचा जन्म 15 जानेवारी 1915 साली गुजरात राज्यातील 'धांगध्रा' येथे झाला. कुँवरश्याम घराण्याच्या गायकीला नवीन दिशा देण्यासाठीच पंडीतजी अवतरले होते असे म्हणता येईल. हे विलक्षण प्रतिभाशाली व्यक्तीमत्व व्याकरणासंबंधी जागरूक होते. त्यांनी संगीताचे 1.शब्द व 2.सूर हे दोन संप्रदाय मान्य केले होते. शब्द व सूर यांच्या संयोगाने क्रांती तर दुरूपयोगाने भ्रांती निर्माण होते असे ते म्हणतात. म्हणूनच गुणीगंधर्वांच्या बंदिशीरचनांमध्ये शब्द व स्वरांचे वैभव जाणवते, यासोबत धमार, तराणा, त्रिवट, चतुरंग रचना त्यांनी केलेल्या आहेत. पंडितजींच्या बंदिशी संकलनात एकूण पाच अंगांचा समावेश आहे 1.धृपद अंग 2.नृत्य अंग 3.टप्पा अंग 4.ठुमरी अंग 5.धवरू अंग.1 वरील चार अंगाचा आपल्याला परिचय आहेत परंतु धवरू अंग याबद्यल सांगायचे झाल्यास पं.लक्ष्मणप्रसादजी सांगतात की,

'देखन को सीधा लागे, आडो अंग सुहाय,
गुँथे सुरन की माल सो, धँवरू अंग कहाय' ।[2]

याचा अर्थ असा की रचनांमध्ये स्वरांची गुंफण सरळ जरी दिसत असेल तरी त्या स्वररचना मींडयुक्त, गुंतागुंतीच्या परंतु रागनियमांचे पालन करून गुंफलेल्या असतात. उदाहरणार्थ–भूपाली रागातील स्वर सारेगपधसां याप्रमाणे आहेत. परंतु बंदिशीमध्ये पंडितजींनी अशी सरळ स्वरमाला न. घेता

ग र ब ना किं जें बां व रे
प ध ग प ध रें सां प ग रे रे ग

याप्रमाणे घेतली आहे. व अश्याच वक्रतेने नटवून संपूर्ण बंदिश त्यांनी स्वरलिपीबध्द केलेली आहे. अर्थातच ही बंदिश धवरू अंगाची आहे हे स्पष्ट होते. गायकी करतांना प्रत्येक घराण्याची स्वतःची विशिष्ट पध्दती असते व त्यानुसार ती गायकी प्रसिध्दीस येत असते. डॉ.मंगरूळकर म्हणतात ''घराण्याची शैली अनुकरणशील असावी, त्यात शैलीला योग्य प्रसार–प्रचार माध्यम, रसिक भक्त, सुजाण श्रोते, लोकमान्यता व लोकप्रियताही मिळावी''[3] अशा विविध लोकप्रिय घराण्यांच्या गायकीचा विचार केल्यास त्यांची वेगवेगळी वैशिष्ट्ये दिसून येतात, जसे– ''किराणा घराण्यात बंदिश प्रस्तूत करतांना बंदिशीच्या मुखडयापर्यंतच सिमीत गायकी केली जाते. तसेच स्वरलगांव अनुनासिक तथा कधी कधी कृत्रिम वाटतो.''[4]

ग्वाल्हेर घराण्यात गायकी करतांना खुला, जोरदार आवाज लावण्याची पध्दत आहे तर जयपूर घराण्यात बंदिशी छोट्या असून कधी कधी अंतरा गायल्या जात नाही.[5] म्हणजेच त्या–त्या गुणवैशिष्ट्यांनी प्रत्येक घराण्याची विशिष्ट ओळख झालेली असते. याचप्रमाणे कुँवरश्याम घराण्याच्या बंदिशीची गायकी करतांना पंडितजींच्या वास्तव्याबाबत सांगताना त्यांनी दिल्ली व मुंबईत अधिक काळ वास्तव्य केले. मुंबईला तर ते ब–याच कालावधीनंतर वास्तव्यास आले होते. मूळचे ते राजस्थानचे रहिवासी होते. स्वतः वय वर्षे 01 व त्यांचे बंधू मुरलीधर प्रसाद वय वर्षे09 चे असतांना त्यांच्या आईचे निधन झाले. पुढे वयाच्या 4–5 वर्षापासून त्यांचे वडील पं. बदलेवप्रसादजी जेव्हा जेव्हा संगीताचा रियाज किंवा मैफील करीत तेव्हा तेव्हा त्यांच्यासोबत बोबडया बोलात बाललक्ष्मण गाण्याची नक्कल करीत असत. तसेच हुबेहुब गाण्याचा प्रयत्न ते करीत असत. लहानपणापासून मातृप्रेम हरविलेल्या या लक्ष्मणाची परमेश्वर जणू परिक्षाच घेत होता. ते केवळ 9 वर्षाचे असतांना वडिलांचा स्वर्गवास झाला. थोरले बंधू मुरलीधर यांच्यासोबत 'श्रीकृष्ण थिएटर कंपनी ऑफ कानपूर' या प्रसिध्द नाटक कंपनीत पोटाची खळगी भरण्याकरिता ते अभिनय करू लागले. त्यांचा गाण्याचा पिंड तर होताच म्हणून पुढे त्याच नाटककंपनीत ते गाणे गाउ लागले. असा प्रवास करीत करीत कालांतराने कुँवरश्याम घराण्याच्या शिष्यांसोबत परिचय होवून त्यांनी पं.मोहनलाल, श्री. लाडलीप्रसाद व बाबा गोपालजी यांचेकडून शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले. कारण शास्त्रीय संगीताच्या अपूर्ण शिक्षणामुळे ते बेचैन होते. पण या घराण्यातील गायकी शिकल्यानंतर दिल्लीहून पंडीतजी मुंबईला आले तेव्हा त्यांचे विचार प्रकट करतांना ते म्हणतात, ''मै चाहता हूँ की मुझे यहाँ एक ऐसा स्थान प्राप्त हो, जहाँ से मैं अपने संगीतसे जनता की सेवा और प्रचार करू । मेरा विचार है कि अपने गुरू परंपरा अनुसार शिक्षा आज विद्यार्थियों को मिलनी चाहिये''[6] पं.लक्ष्मणप्रसादजी श्रीकृष्ण थिएटर कंपनीमध्ये असतांना तिथे असलेल्या कन्हैयालाल नावाच्या एका कलाकाराकडून त्यांना ब–याच चिजा प्राप्त झाल्या. पुढे जयपूरला गेल्यानंतर ग्वाल्हेरच्या राजदरबारचे गायक श्री.चुन्नीलाल जे लक्ष्मणप्रसादजींचे काका होते, या चुन्नीलाल काकांकडून त्यांनी जयपूर घराण्याच्या गायकीचे शिक्षण घेतले. मुंबई प्रांतातील त्यांचे मामा श्री. प्यारेलालजी सुध्दा अनेक चीजा त्यांना देत असत, शिकवित असत. प्यारेलालजी गायक तर होतेच पण उत्तम नृत्यकार सुध्दा होते. प्यारेलालजी व चुन्नीलालजी यांच्या जयपूर गायकीचा लक्ष्मणप्रसादजींवर प्रभाव होताच. जयपूर घराण्यात ख्यालांपेक्षा ठुमरी अधिक गायल्या जाते त्यामुळे लक्ष्मणप्रसादजीसुध्दा सुरूवातीच्या मैफलीत ठुमरी जास्त गाजवायचे. कालांतराने जेव्हा कुँवरश्याम घराण्याची गायकी अवगत केली तेव्हा साहित्याने नटलेल्या चिजांचे ते गायन करू लागले. कुँवरश्याम घराण्याच्या विशेशता कायम ठेवून त्या घराण्याचा प्रचार–प्रसार केला.

***गायनातील वैशिष्ट्ये :–***

ख्याल गायन करतांना पं. लक्ष्मणप्रसादजी रिशभ, मध्यम, पंचम, निशाद अशा चढत्या क्रमाने स्वरलगाव करीत सहजतेने स्वर संचालन करीत असत. बंदिशीत तिहय्या, मुरकी, सपाटतान, गमक इत्यादिंचा मोठ्या चपळतेने ते प्रयोग करीत असत. इ.स.1944 साली पंजाबमधील जालंदर याठिकाणी हरिवल्लभ कॉन्फरन्समध्ये पं. लक्ष्मणप्रसादजींना गायनाकरिता निमंत्रण आल्यानंतर त्यांनी आपल्या गायनाची उपस्थिती तिथे दिली. दोन तंबोरे स्वरात लाउन स्वतः गाण्यात धुंद तर झालेच पण श्रोत्यांनाही आपल्या गायनाने मंत्रमुग्ध केले. श्रोत्यांना त्यांच्या गाण्यातून आनंद प्राप्त झाला, श्रोते तृप्त झाले. स्वामी हरिवल्लभदासजी त्यांच्या गायनाने खूश होउन स्तूतीपररित्या जाहिर करतात की ''स्वर, लय, साहित्य या तिन्हीचा मिलाफ लक्ष्मणप्रसादजींच्या गाण्यात आहे. ते गंधर्व तर आहेतच पण एक समजदार गंधर्व आहेत म्हणून 'गुणीगंधर्व' अशी आर्शिवादयुक्त उपाधि मी त्यांना देत आहे, तिचा ते सहर्श स्विकार करतील असा मला विश्वास आहे''[7] हा सन्मान लक्ष्मणजींना जाहीर झाल्याबरोबर सभामंडपातील श्रोत्यांच्या टाळ्यांचा प्रचंड

कडकडाट झाला व तेव्हापासून पं. लक्ष्मणप्रसाद हे 'गुणीगंधर्व' म्हणून ओळखले जाउ लागले. त्यांनी संगीत घराण्यांची गायकी अवगत केली परंतु स्वतःच्या बुध्दी चातुर्याने, ज्ञानतेजाने, स्वरमाधुर्याने घराण्याचे नांव अलौकीकतेवर नेउन ठेवले. ''प्रत्येक गायकाचा स्वतःच्या आवाजाचा म्हणून खास धर्म असतोच. प्रत्येक नामवंत गायक हा आपल्या गुरूची फोटोग्राफी नसतो. परंपरेने आलेल्या गुणांत तो पाहीलेले व ऐकलेले गुण सामील करून आपला स्वतंत्र रांधा तयार करतो. त्याच्या प्रभावशाली व्यक्तीमत्वाने तो नावारूपास येतो''[8] पं.लक्ष्मणप्रसादजी असेच नावारूपास आलेले व्यक्तीमत्व होते. जयपूर घराणे व गोस्वामी कुँवरश्याम घराणे या दोन घराण्यांची गायकी त्यांच्या गाण्यात एकवटलेली, सामावलेली होती. या दोन्हींचे अद्‌भूतपूर्ण, चमत्कृतीपूर्ण व साजेसे मिश्रण त्यांच्या गायकीत होते. जयपूर घराण्यात लयीचे निरनिराळे चमत्कृतीपूर्ण अविष्कार आढळतात. गोस्वामी कुँवरश्याम घराण्याबद्दल बोलायचे झाल्यास यांची गायकी ही धृपद अंगाची आहे. चीजेतील शब्दांना विशेष अर्थ असावा, ते साहित्यास शोभावेत यावर गोस्वामी घराण्यातील रचनाकारांचा विशेश भर असतो. कुँवरश्याम घराण्याचे वैशिष्ट्यें म्हणजे मेरूखंड, उपकण, छूट, मींड इत्यादी चा प्रयोग केलेला असून स्वरलगाव सहजता, छंद्रप्रबंध लयप्रधानता हे होय. या घराण्याच्या बंदिशी नृत्यप्रधान आहेत हे या घराण्याचे विशेशत्वच आहे. अशा या दोन्ही घराण्यांच्या गायकीचे सुरेख मिश्रण गुणीगंधर्व पं.लक्ष्मणप्रसादजींच्या गायकीत झाल्याने गायकीला वजन प्राप्त झाले, स्वतःचे अस्तित्व कायम झाले. कोणत्याही स्वरसमुहाला किंचीत वक्रतेने नटवून मांडणे हे पंडितजींचे खास वैशिष्ट्य. या वक्रतेतही ऋतुजा आणि सहजता हा गुण महत्वाचे म्हणून सांगता येतील. पंडितजींनी स्वतः अनेक रागांच्या चीजा आणि तराणे बांधले असून त्यांचा 'गायकी रहस्य' नावाचा संगीतग्रंथ प्रकाशीत झाला. गायनासोबतच एक रचनाकार म्हणून काही बाबी त्यांना महत्वाच्या वाटतात. ते म्हणतात, रचना साहित्यास शोभा देणारी असावी ज्यामुळे तो–तो भाव त्या–त्या रचनातून जागृत व्हावा, वेगवेगळ्या रागांच्या मिश्रणाने नवनवीन राग निष्पत्तीचे सौंदर्यरूप प्रकट व्हावे. गुणीगंधर्वांनी स्वतः काही जोडरागांच्या रचना तयार केल्या, ज्यामध्ये जोगबहार, नटचंद्र या रागांची नावे सांगता येतील. जोडरागांचे सांधे ते इतक्या कलात्मकतेने जोडीत असत की त्या जोडरागांतील राग स्पष्ट दिसत असूनही एका रागातून दुस–या रागात त्यांनी नेमका कसा व कोठून प्रवेश केला हे मोठमोठ्या कलावंतानाही आकलन होत नसे. दरवेळी वेगवेगळ्या स्वरसंपत्तीने एका रागातून दुस–या रागात ते प्रवेश करीत असत. यातून त्यांच्या प्रतिभेचे दिव्यत्व व विद्येचे तेज झळाळते. पंडितजींच्या गाण्यात बोलताना फारश्या आढळत नाही त्याऐवजी ते सरगमच्या माध्यमातून चिजेला नटवितात. याठिकाणी प्रसिध्द गायक नुसरत फतेह अली खान यांचे नक्कीच स्मरण होते. कारण गाण्यात सरगम असण्यावर त्यांचा विशेष भर होता'' "Nursat F.A.Khan Also Popularize the Interjection of sargam singing at this point"[9]

सरगम, स्वरमालिका गाणे म्हणजे इमारतीचा पाया मजबूत असण्याची लक्षणे आहेत. कारण केवळ गाणे व तंतोतंत गाणे हा भाग निराळाच. पंडितजींना गाण्यात बोलताना घेउन चिजेतील शब्दांचे तुकडे करणे आवडत नसे. त्यातून आशय निर्माण व्हावा हा त्यांचा प्रामाणिक उद्‌देश होता ''गातेवेळी स्वरप्राधान्य हवे की भावप्राधान्य हवे हे ठरवितांना गीतातील आशयाकडे अभ्यासपूर्वक पाहावे लागेल. ज्याठिकाणी भावप्रदर्शन अपेक्षित असेल त्याठिकाणी ते दिसलेच पाहीजे. जसे संत तुकडोजी महाराजांचा गळा गायनानुरूप नसूनही होणारा परिणाम हा योग्य भावप्रदर्शनाचाच म्हणावा लागेल.''[10] यामध्ये भावप्रधानता असलेली आढळून येते. चांगली चीज अर्थात उत्तम बंदिश रागाचे बीजत्व असते. त्यात त्या रागांची अंगप्रत्यंगे मोठ्या कलात्मक खूबीने दर्शविली असतात. निष्णात गवैय्ये ही सुंदर अंगे शोधून त्याची उकल करतात. चीजेची बांधणी ज्या अंगाची आहे ते अंग सोडून नुसते भलतीकडे आलापताना गायल्याने रागबाधा होते, रागाला अपाय होतो. म्हणजेच गायकाला त्या चीजेचा स्वभाव कळला नाही हे लक्षात येउ लागते. ही रागहानी न होण्यासाठीच पं. लक्ष्मणप्रसादजी चीजेची बांधणी ज्या अंगाची आहे त्याला अनुसरून त्याचे व्याकरण असावे असे म्हणतात व बंदिश रचना साहित्यास शोभणा–या असाव्या असा आग्रह धरतात.

गुणीगंधर्वांच्या ख्यालगायनात अचाट कल्पनाविलास, अचूक सौंदर्यदृष्टी व मार्मिक रसिकता आहे. स्वरविलासाची मर्यादा ते आपल्या आवाजधर्मानुसार सहजता प्राप्त होईल इर्थपर्यंतच ठेवीत असत. आवाजाची कृत्रीमता किंवा ताणतणाव करून आरडाओरडा करणे किंवा शब्दांची खांडे करणे अर्थात शब्दांचे अनर्थी तुकडे करणे असे कलाविघातक कृत्य त्यांच्या गायकीत नव्हते. सरळ रागातून सुध्दा वक्र व पेचदार बंदिशी रचना करण्याचे कौशल्य त्यांच्याजवळ होते तसेच मधुर कंठध्वनी या सर्व बाबीतून त्यांची गानसिध्दी लक्षात येते.

***अध्यात्म*** – या घराण्याची आध्यात्मिक, भक्ती योगाची परंपरा आहे. स्वतः कुँवरश्यामजी केवळ मंदिर–मठातच गात असत. केवळ भक्तीमार्ग त्यांनी अवलंबिला होता. खरे तर ''इतिहासाची साक्ष अशी की संतकवी आणि तत्वज्ञानी भक्तांमुळे वैष्णवभक्ती देशभर फैलावली, भक्तीकल्पनेस धर्मशास्त्रीय आणि तत्वज्ञानीय चौकटी पुरविण्याचे कार्य तत्वज्ञानी भक्तांनी पार पाडले, तर हजारो गीते रचून अनेक गीतप्रकार निर्माण करून देश पालथा घालीत संतकवींनी भ्रमंती केली आणि जनसमुदायांना आपलेसे केले.''[11] वरील सर्व लक्षणे पं. लक्ष्मणप्रसादजींमध्ये अस्तित्वात होती. त्यांनी घराण्याच्या गायकीच्या प्रचार–प्रसारासाठी देशभ्रमंती केली. जन्मजात व स्वकतृत्वाने गायकीला लखलखते भव्यदिव्य प्रकाशमय केले. सर्व घराण्यांचे जरी सर्वसामान्य सर्वमान्य कायदे असले तरी त्याच्या अंतर्गत स्वरूपाची मांडणी त्या–त्या घराण्याची गायकी दर्शविते असते. रागगायन करतांना किंवा चीज म्हणताना रागामध्ये कोणते स्वर घ्यायचे, कोणते वर्ज्य करायचे, कोणते सरळ व कोणते वक्र घ्यायचे, कोणते अल्प घ्यायचे, कोणत्या स्वरावर मुक्काम करायचा, अधिक महत्व कोणत्या स्वराला व त्या खालोखाल कोणता स्वर सांभाळायचा अशा बारीकसारीक गोष्टींचे सूत्ररूपाने विशीष्ट अशी पध्दतशीर मांडणी हे गुणीगंधर्वांच्या गायकीचे वैशिष्ट्य होय. उपशास्त्रीय संगीतामधील टप्पा या गीतप्रकाराची क्लिश्ट गायकी पंडीतजींनी त्यांचे सासरे श्री. बद्रीप्रसादजी यांचेकडून अवगत केली, पं.लक्ष्मणप्रसादजी गुणग्राही प्रवृत्तीचे कलाकार होते. संगीतातील नवनवीन बाबींचा ते विचारपूर्वक अभ्यास करीत असत. लयकारीयुक्त मेरूखंडाच्या तानप्रणाली शिक्षणाचे गुरू त्यांचे वडील बलदेवप्रसादजी होते. पं.बलदेवप्रसादजींनी प्रसिध्द नृत्यकार श्री. बिन्दादीन महाराज यांचेकडून नृत्याचे शिक्षण घेतल्याने ते एक उत्तम नृत्यकार देखील होते. पं. लक्ष्मणप्रसादजींना ही कला परंपरेनेच आली. त्यांनी मेरूखंडाच्या शिक्षणानंतर धृपद–धमाराचे शिक्षण कुँवरश्याम घराण्यातून घेतले. ते आध्यात्माचे जाणकार होते. त्यांच्या बंदिशीरचनांमध्ये भक्तीभाव प्रकर्शाने दिसून येतो. अध्यात्म भावनेने संगीताची खोली निर्माण होते कारण संगीत व अध्यात्म एकमेकांशी निगडीत व पूरक आहेत.

***कलात्मकतेतीत रूपांतरण*** –

एकदा मोठ्या द्विधा मनस्थितीच्या कार्यक्रमाचे निमंत्रण गुणीगंधर्वांना मिळाले. दरबारातील गायनमैफलीत पं.लक्ष्मणप्रसादजींनी बेसूरे गावे अशी बिकानेर महाराजांची आज्ञा होती. त्यावेळी पंडीतजी म्हणतात, ''आपने हमे कठिन परिक्षा में डाल दिया है, जैसे कोई कलाकार एकदम सूर में नहीं गा सकता, वैसे ही सूर में गानेवाले पूरी तरह बेसूरा गाना यह बहोत मुश्कील है, कही न कहीं तो हार्मोनियम या तानपूरे में सूर मिल जायेंगे। लेकिन आपकी इच्छानुसार मैं आपको बेसूरा गाना जरूर सुनाउंगा''[12] व असे म्हणून पंडितजींनी त्या कार्यक्रमाची कबूली स्विकारली. कार्यक्रमाच्या दिवशी त्यांनी दरबारात ठुमरीगायन केले 'हम जो गई थी पनिया भरन, पैर में कॉटा लगा मोरी गुईया' ही ठुमरी महाराजांच्या आज्ञेमुळे पंडीतजींनी ती इतकी महाबेसूरी गायली की ऐकून सर्व आश्चर्यचकित झाले, ते ठुमरीगायन आजही बिकानेर दरबाराच्या संगीतविभागात सुरक्षित उपलब्ध आहे. म्हणजेच ज्या गोष्टीचा निर्धार गुणीगंधर्व पं.लक्ष्मणप्रसादजी करीत असत ती गोष्ट साध्य करण्यासाठी ते प्राण पणाला लावीत असत अशा प्रकारे दुर्दम्य महत्वाकांक्षी व चिवट वृत्तीचा कलासाधक म्हणजे पं.लक्ष्मणप्रसादजी होत. परिपूर्ण संगीत म्हणजे उत्तम गायन, उत्तम तबलावादन व नृत्यांचे बारकावे त्यांना परिचीत होते. कुँवरश्याम घराण्यात लय एकीकडे धृपद अंगाने प्रभावीत तर एकीकडे कथ्थक नृत्य तसेच तबलावादन यामुळे स्वर–लयीचे संमिश्र स्वरअमृत रसायन पंडीतजी तयार करीत असत. कलेमधील प्रायोगिकतेने प्रत्येक स्वर हा लयसंस्कारीत असावा यादृष्टीने संगीताचे माध्यम केवळ स्वर किंवा केवळ लय न राहता लयसंस्कारीत स्वर असे होते, हा संयोग पंडीतजींच्या गायनात आपल्याला आढळून येतो म्हणतात ना, 'कलावंत हा जन्मावा लागतो. ''प्रामाणिक आणि कठोर तपश्चर्येने विद्वान व कारागीर तयार होउ शकतील परंतू कलावंत तयार होण्यास त्याला कलावंताचा पिंडच निसर्गतः, जन्मतः लाभणे होय, ज्यांना नैसर्गिक देणगीचे मान बेताबेताचे होते, अशांनी प्रचंड परिश्रमाने 'गंधर्वपद' मिळविले''[13] ''पं.लक्ष्मणप्रसादजींच्या शिष्यांमध्ये पं.राजाराम शुक्ल, श्री.मुरलीमनोहर, श्री.दिनेश यांची नावे विशेष उल्लेखनीय आहेत. पं.लक्ष्मणप्रसादजी ख्याल, धृपद, ठुमरी, भजन, गझल इत्यादि सर्व गीतशैलीचे कलाप्रदर्शन सफलतापूर्वक आपल्या गायनात करीत असत''[14]

पंडीतजींच्या शिष्या श्रीमती गीता भटिया म्हणतात की, क्लिष्ट बंदिशी देखिल सोप्या व सुलभ पध्दतीने शिकवून कमी वेळेतच त्याचे आकलन आम्हा शिश्यांना होत असे व ते कायम स्मरणातदेखील राहत असे, इतकी सुलभता व सहजता पंडीतजींच्या गायनात, गायन शिकविण्यात होती. सहृदय, विनम्र व सद्‌भावी व्यक्तीमत्वाच्या या कलाकाराकडे संगीताच्या अफाट धनासह अलौकीक तेज होते असे बहुगुणसंपन्न प्रत्यक्षदर्शी म्हणजेच गुणीगंधर्व पंडित लक्ष्मणप्रसादजी जयपूरवाले हे होत. या महान गुणी व ज्ञानी गंधर्वाचे निर्वाण 16 डिसेंबर 1977 साली झाले.

*निष्कर्ष :–*

1.बालपणापासून दिल्या गेलेल्या शिक्षणाचे संस्कार मुलांवर आजीवन कायम राहतात.

2.आपआपल्या तर्कशुध्द अंतिम लक्ष्याकडे पोहचण्यासाठी आत्मविश्वास व सिध्दीसाधना आवश्यक असते. त्याकरिता स्वतःमध्ये सकारात्मक दृष्टिकोन, स्वजाणीव, स्वआदर, वेळेचे व्यवस्थापन इ. गोष्टी आवश्यक आहेत.

3.संगीत वास्तवाचा वेध घ्यावयाचा असेल तर जिद्द, चिकाटी आवश्यक आहे.

4.संगीतशिक्षा संस्कृती व सभ्यतेचे जतन, संरक्षण करते.

5.कुँवरश्याम घराण्याच्या केवळ मंदिर–मठापर्यंत सिमीत असलेल्या गायकीचा देशभर भ्रमण करून जनसामान्यांपर्यंत पंडीत लक्ष्मणप्रसादजींनी प्रचार–प्रसार केला.

6.गायनामध्ये स्वरांसोबत शब्दालादेखील महत्व असावे म्हणजे साहित्याची दखल पंडीतजींच्या बंदिशीत घेतलेली दिसून येते, कारण शब्द व स्वरांमुळे मानवी मनावर सखोल परिणाम होउन मानसिक शांती मिळते.

*संदर्भ ग्रंथ सूची*

1.पं.जयपूरवाले गिरधरप्रसादजी, संगीत ज्ञान प्रकाश भाग 2, संगति–जस प्रकाशन मुंबई 1999, पृष्ठ क. 04

2.पं.जयपूरवाले लक्ष्मणप्रसादजी, संगीत ज्ञान प्रकाश भाग 1, संगति–जस प्रकाशन मुंबई 1999, पृष्ठ क. संपादकिय

3.डॉ. मंगरूळकर नारायण, संगीतातील घराणी आणि चरित्रे, स्वरसंपदा प्रकाशन, नागपूर 1 मार्च 1992, पृष्ठ क. 09

4.डॉ. खोत जयंत, उस्ताद अब्दुलकरीत खॉं का भारतीय संगीत को योगदान, डॉ. चौबे ए.सी. निर्देशक 1993, पृष्ठ क.100

5.तत्रैव

6.श्री. शुक्ल मुरलीमनोहर, गुणीगंधर्व पं. लक्ष्मणप्रसाद, संगीत मासीक 1952, संगीत कार्यालय हाथरस, उत्तरप्रदेश

7.श्री. बाके रामकृष्ण, गुणीगंधर्व पं. लक्ष्मणप्रसाद जयपूरवाले, धर्नुधारी दिवाळी अंग 1960

8.श्री. देशपांडे वा.ह. घरंदाज गायकी मौज प्रकाशन मुंबई 1985, पृष्ठ क.23

9.En.wikipadia.org/wiki/Qawwali,20/05/2013,8.30pm

10.श्री.देव यशवंत, शब्दप्रधान गायकी, पॉप्युलर प्रकाशन मुंबई 1978, पृ.क.42

11.डॉ. रानडे अशोक, संगीत विचार, पॉप्युलर प्रकाशन मुंबई 2009,पृष्ठ 99

12.पं. जयपूरवाले लक्ष्मणप्रसादजी, संगीत ज्ञान प्रकाश भाग 1, संगति–जस प्रकाशन मुंबई, 1999, पृष्ठ क. 257

13.डॉ. मारूलकर ना. र., संगीतातील घराणी, सर्वोदय मुद्रणालय पुणे, 1962,पृष्ठ क. 145

14.श्री. गर्ग लक्ष्मीनारायण, हमारे संगीत रत्न भाग1, संगीत कार्यालय हाथरस प्रकाशन, 01–05–1957, पृष्ठ क. 336